सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.४५९ ठ. क्र.३४३
दि.३०/३/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९५ नुसार सन २०१५-१६ चे सुधारित व सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक अ व क मा.आयुक्त यांनी दिनांक १५/२/२०१६ रोजी मा.स्थायी समितीकडे सादर केलेले आहे.मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ७६५ दिनांक १९/३/२०१६ अन्वये सन २०१५-१६ चे सुधारित अंदाजपत्रकास शिफारस करण्यांत येत असून,सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकामध्ये फेर बदल करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०० अन्वये मान्यता मिळणेस्तव आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.मा.स्थायी समितीने शिफारस केलेले सन २०१५-१६ चे सुधारित अंदाजपत्रक मंजूर करणेत येत आहे.तसेच सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे फेरबदल करुन प्रस्तुत बदलासह सुचना शिफारशीसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०० अन्वये अंदाजपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

**महसुली जमा बाजू**

| पान नं. | अ.क्र | जमा विवरण | मा.स्थायी समितीने सुचविलेला अंदाज | मा.म.न.पा.ने केलेला बदल | | मा.म.न.पा.ने केलेला अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वाढ | कपात | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १८ | ७ क | **पथ व इमारती** | | | | |
| | १० | जाहिरातीपासून उत्पन्न दिशादर्शक कमान (गॅल्ट्रीगर्डर) | १०,००,००० | ९०,००,००० | --- | १,००,००,००० |

उपरोक्त बदलामुळे एकूण बेरजेत खालील प्रमाणे बदल करण्यांत येत आहे.

पृष्ठ क्र.२३ वरील १ ते १४ ची बेरीज र.रुपये ६७५,३७,९६,०००/- ऐवजी र.रुपये ६७६,२७,९६,०००/- इतकी येते.शिलकेसह एकूण र.रुपये ६७६,३०,५३,४०१/- इतकी येते.

...२

महसुली खर्च बाजू

| पान नं. | अ.क्र | जमा विवरण | मा.स्थायी समितीने सुचविलेला अंदाज | मा.म.न.पा.ने केलेला बदल | | मा.म.न.पा.ने केलेला अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वाढ | कपात | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ३६ | ३ | **प्राथमिक व दुय्यम शिक्षण** | | | | |
| | क | **प्राथमिक शिक्षण** | | | | |
| | १ | प्राथमिक शिक्षण | १६,००,००,००० | - | १,००,००,००० | १५,००,००,०० |
| | २ | बिगर प्राथमिक शिक्षण | ३,००,००,००० | १,००,००,००० | - | ४,००,००,०० |
| ७७ | २२ | **महसूल निधीतून वर्ग करण्याची रक्कम** | | | | |
| | क | महसूल निधीतून भांडवली कामासाठी वर्ग करणेची रक्कम | ३०९,२०,१३,००० | ९०,००,००० | - | ३१०,१०,१३,००० |

उपरोक्त बदलामुळे एकूण बेरजेत खालील प्रमाणे बदल करण्यांत येत आहे.पृष्ठ क्र.७५ वरील १ ते २३ ची बेरीज ६७५,३७,९६,०००/- ऐवजी र.रुपये ६७६,२७,९६,०००/- इतकी येते.शिल्लकेसह एकूण र.रुपये ६७६,३०,५३,४०१/- इतकी येते.

भांडवली जमा बाजू

| पान नं. | अ.क्र | जमा विवरण | मा.स्थायी समितीने सुचविलेला अंदाज | मा.म.न.पा.ने केलेला बदल | | मा.म.न.पा.ने केलेला अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वाढ | कपात | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ८२ | अ | **महसूल निधीतून करावयाची कामे.** | | | | |
| | १ | महसूल निधीतून वर्ग करणेची रक्कम | ३०९,२०,१३,००० | ९०,००,००० | - | ३१०,१०,१३,००० |

वरील बदलामुळे अ ची बेरीज र.रुपये ३२७,८०,१३,०००/-ऐवजी र.रुपये ३२८,७०,१३,०००/- इतकी येते.तसेच अ ते इ ची बेरीज र.रुपये ५५०,९०,१३,०००/- ऐवजी र.रुपये ५५१,८०,१३,०००/- इतकी येते.

...३

## भांडवली कामाच्या खर्चाचा तक्ता

| अ.क्र. | विवरण | र.रुपये (लाखात) |
|---|---|---|
| १. | रस्ते बांधणे | ६००.०० |
| २. | शहरातील बागांचे सुशोभिकरण करणे, सुधारणा करणे व नविन बाग करणे | ५००.०० |
| ३. | शहरातील पुतळे परिसर सुधारणा करणे व नविन पुतळे बसविणे व स्मारक बांधणे | ५००.०० |
| ४. | एमआयडीसी भागात विविध सुधारणा करणे (TCIDS) | १००.०० |
| ५. | वॉर्डवाईज कामे | ९६३.०० |
| ६. | सोलापूर सायन्स सेंटर अनुदान | २८.०० |
| ७. | ड्रेनेज लाईन घालणे व गटारी बांधणे | ५००.०० |
| ८. | पाण्याच्या टाक्या बांधणे व पाईप लाईन घालणे /उजनी पाकणी सोरेगांव भवानी पेठ येथे फ्लो मिटर बसविणे | १०००.०० |
| ९. | नागरी दलित वस्ती पाणीपुरवठा योजना | १००.०० |
| १०. | गुंठेवारी क्षेत्रात मुलभूत सोयी करणे | १६०.०० |
| ११. | विविध योजनेसाठी डी.पी.आर. तयार करणे | २००.०० |
| १२. | विविध योनेसाठी म.न.पा. हिस्सा | ४५००.०० |
| १३. | भूसंपादन करणे/म.न.पा. जागा ताब्यात घेणे /नुकसान भरपाई /खर्च वगैरे देणे | ५००.०० |
| १४. | नाला ट्रेनिंग करणे,नाला उंची वाढविणे | ३००.०० |
| १५. | शहर व हद्दवाढ भागातील विविध विकास कामे करणे | ७७१९.१३ |
| १६. | दिवाबत्तीची सोय करणे | ५००.०० |
| १७. | स्मशानभुमी सुधारणा करणे | ५००.०० |
| १८. | शहरात विविध ठिकाणी महिलांसाठी सुलभ शौचालय बांधणे | १००.०० |
| १९. | स्मार्ट सिटी महानगरपालिका हिस्सा | ५०००.०० |
| २० | पंतप्रधान आवास योजना मनपा हिस्सा | २५००.०० |
| २१. | अमृत योजना अनुदान | १८००.०० |
| २२. | बोअर पुर्नःभरण व सौरउर्जा बसविणे दोन इंची ईल्ड असेल अशा बोअरवर सौरउर्जा बसविणे | ७००.०० |
| २३. | लेप्रसी मानधन | २०.०० |
| २४. | महाराष्ट्र गुणवंत कामगार मोफत बस प्रवासाकरिता परिवहन उपक्रमास अनुदान | ५.०० |
| २५. | नविन कुपनलिका करणे | ३००.०० |
| २६. | मागील भांडवली कामासाठी कमी पडणारी रक्कम | ५००.०० |
| २७. | सिध्देश्वर काठी मार्ग व लोकमान्य मिरवणूक मार्ग ओव्हरलोड वायर अंडरग्राउंड करणे | १५०.०० |
| २८. | विभागीय कार्यालय क्र. १ ते ८ कडील विविध मेन्टेंनन्स कामासाठी कमी पडणारी रक्कम | ४००.०० |
| २९. | देगांव,प्रतापनगर व कुमठे एस.टी.पी.करीता संरक्षण भिंत बांधणे | २००.०० |

...४

| | | |
|---|---|---|
| ३०. | नगरोत्थान राज्यस्तरीय योजनेअंतर्गत सोलापूर शहरामध्ये रस्त्याच्या कामामध्ये अडथळा येणारे इले.पोल शिफ्टींग करणे | ३००.०० |
| ३१. | हुतात्मा बाग सुशोभिकरण करणे | १००.०० |
| ३२. | देगांव सीवेज ट्रीटमेंट प्लँट ते कवठे रोड ते डोणगांव रोडवर मुख्य ड्रेनेज लाईन टाकणे | १२५.०० |
| ३३. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन बांधणे(म.न.पा.जागेत म.न.पा.च्या व्यवस्थापनाखाली) | २००.०० |
| ३४. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती साजरा करणे | ५०.०० |
| ३५. | नगरअभियंता भांडार याठिकाणी मिटींग हॉल व समित्यांचे कार्यालय बांधणे | २००.०० |
| ३६. | मा.महापौर निवास /मा.आयुक्त निवास नवीन बांधणे | २००.०० |
| ३७. | लष्कर मध्यवर्ती मिरवणूक मार्ग ओव्हरलोड वायरिंग अंडरग्राऊंड करणे | १००.०० |
| ३८. | शहर व हद्दवाढ भागात खाजगी नळांना मिटर बसविणेकामी कमी पडणारी रक्कम | ५००.०० |
| ३९. | शहरात व पाणी जलशुध्दीकेंद्रात सीसीटीव्ही कॅमेरा बसविणे | २००.०० |
| ४०. | अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र | २००.०० |
| ४१. | हिंदू-हदयसम्राट कै. बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक उभारणे | २००.०० |
| ४२. | माजी राष्ट्रपती कै. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे स्मारक उभारणे | ५०.०० |
| ४३. | माजी मुख्यमंत्री कै. विलासराव देशमुख यांचे स्मारक उभारणे | ५०.०० |
| ४४. | माजी केंद्रीय मंत्री कै. गोपीनाथ मुंडे यांचे स्मारक उभारणे | ५०.०० |
| | एकूण | ३२८७०.१३ |

जिल्हा नियोजन समिती करीता लागणारा मनपा हिस्सा भांडवली कामाचा खर्चाचा तक्त्यामधील ज्या त्या हेडमधून करण्यात यावा.व उर्वरित हेड मधील शिल्लक रक्कमेतून कामे सुचविणे अथवा बदल करणेचा अधिकारी मा.महापौर व मा.सभागृह नेता यांना राहील.

मा.महापौर व मा.उपमहापौर,मा.अध्यक्ष-स्थायीसमिती,मा.सभागृह नेता,मा.विरोधी पक्षनेता,मा.अध्यक्ष प्रभाग समिती तसेच मा.विशेष सात समित्यांचे अध्यक्ष/मा.महापौर यांना ऐच्छिक खर्चाची जी रक्कम तरतूद करण्यांत आले आहे त्यास मा.म.न.पा.पदाधिकारी यांना जो खर्च करणे आवश्यक वाटेल अशा खर्चासाठी जी रक्कम तरतुद करण्यांत आली आहे त्यास जे ते मा.पदाधिकारी मंजुरी देतील ती मान्यता सक्षम राहील.

भांडवली कामाचे यादीतील कामात बदल करणेचे व सुचविणेचा अधिकार मा.सभागृहनेता यांना देण्यास मान्यता देणेत येत आहे.

१ ते ८ झोनसाठी मेन्टेंनन्स करिता भांडवली तक्त्यातील निधीचे वाटप करणेचा अधिकार मा. सभागृह नेते यांना देणेस मान्यता देणेत येत आहे.

जीआयएस सर्व्हे प्रमाणे ज्या मिळकतींची नोंद असेसमेंटला नाही त्या मिळकतींच्या नोंदी घेण्याचे काम जून अखेरपर्यंत पूर्ण करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

...५

जे सेवक वसूलीचे काम वेळेवर करणार नाहीत,किंवा वसुली आणणार नाहीत अशा अधिकारी, कर्मचा-यांचे विरोधात शिस्तभंगाची कारवाई करण्यांत यावी.आणि अधिक गांभीर्य प्रकरणात संबंधिताना निलंबित करुन त्यांची चौकशी करण्यांत यावी,यास मान्यता देण्यांत येत आहे.

नगरसचिव कार्यालयाकडील रिक्त असलेल्या सायक्लोस्टाईल ऑपरेटर या पदी याच कार्यालयाकडे कार्यरत असलेले श्री.शेखर सकट यांची नेमणूक करण्यास मान्यता देण्यांस येत आहे.

परिवहन विभागातील श्री.जयप्रकाश आमणगी क.श्रे.लिपिक हे सध्या नगरसचिव कार्यालयाकडे कार्यरत आहेत परंतु त्यांचे वेतन हे परिवहन विभागाकडे असून त्याचे सेवापुस्तकासह वेतन नगरसचिव कार्यालयाकडे वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

पावसाचे पाणी पुर्न:भरण करणेकामी प्रशासनाकडून आवश्यक ती कार्यवाही करणेत यावी. ज्या प्लॅटधारक सोसायटया पाणी पुर्न:भरण योजना राबवतील तसेच हरित पट्टा निर्माण करण्यांसाठी झाडे लावून झाडे जगवतील अशा मिळकतदारांना मालमत्ता करामधून २ ते ३ टक्के सूट देणेबाबत योग्य ती कार्यवाही प्रशासनाकडून ठेवणेत यावी यास मान्यता देण्यांत येत आहे.

ज्या ज्या ठिकाणी मनपाच्या वतीने बोअर घेणेत आलेले आहेत. बहुतांश बोअरचे वाया जाणारे (वेस्टेड वॉटर) पाणी ड्रेनेज अथवा उघडयावाटे वाहून जात असून, ते पाणी वाहून न जाऊ देता याकरिता बोअर पुर्न:भरणची योजना तातडीने कार्यान्वीत करण्यांत यावी यास मान्यता देण्यांत येत आहे.

पाणीपुरवठा काटकसरीने व नागरिकांकरिता पाणीपट्टीत बचत होणेच्या दृष्टीने सोलापूर शहर व हद्दवाढ करिता पाणीपुरवठा मिटरद्वारे करणेत यावा. सदरची कार्यवाही दोन महिन्यात पूर्ण करणेत यावी. अस्तित्वात असलेल्या खाजगी नळ मिटर बसविणेकरिता कोणतेही शुल्क आकारणेत येऊ नये, संबंधीतांना मिटर मोफत देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

एल.बी.टी.संदर्भात ज्या व्यापा-यांनी अभय योजनेमध्ये भाग घेतलेले नाही अशा व्यापा-यांना त्यांना एक संधी देणेच्या दृष्टीने पुन्हा एकदा अभय योजना सुरु करणेत यावी,अशी शासनास विनंती करण्यांत येत आहे.

पाणीपट्टीमध्ये ५०%सवलत देण्याचा ठराव एकमताने केला आहे.त्यासाठी अंदाजपत्रकात उत्पन्नामध्ये कपात केलेली आहे.सबब मागील पाणीपट्टीत ५०%सूट देण्यांत यावी यास मान्यता देण्यात येत आहे.

हद्दवाढ भागातील खुल्या जागांवर ५ टक्के इतकी आकारणी करण्यांत येते ती जास्तीची व अयोग्य अशी आहे. त्यामुळे खुल्या जागेचे मिळकतदार ही ती आकारणी भरत नाहीत. ही आकारणी कमी करावी अशा प्रकारची मागणी अनेक मिळकतदारांनी केलेली असून, ही कर आकारणी जास्त असल्याचे स्पष्ट होत आहे. सदरची आकारणी ५ टक्के ऐवजी २ टक्के करावी याबाबतीत मा.म.न.पा.ठ.क्र. ३०३, दि. १८-२-१६ अन्वये एकमताने ठराव पारित झालेला आहे.त्या ठरावाची अंमलबजावणी तातडीने करावी. याबाबतची नोटीस काढतांना कोणत्याही प्रकारची नोटीस फी, वारंट फी अगर शास्ती लावण्यांत येऊ नये.

मा.म.न.पा.ठ.क्र. ३१ दि. २१-४-२०१० अन्वये सिटी सर्व्हे नं. २४२८ च्या खुल्या जागेवर बांधलेल्या इमारतीचे नियमानुसार मुल्यांकन करुन त्याची होणारी रक्कम संबंधित संस्थेस द्यावी असा ठराव पारित करण्यांत आला आहे. संस्थेबरोबर करारपत्र करत असतांना त्यामध्ये इमारतीच्या बांधकामाची रक्कम देण्यांत यावी असे नमूद नसले तरी वास्तविक पहाता सदर इमारत संस्थेने खर्च करुन बांधलेली आहे. सबब मा.म.न.पा.ठ.क्र. ३१ दि. २१-४-२०१० चे ठरावानुसार कार्यवाही करण्यांत यावी.व भांडवली कामे करणे विवरणातील जागा संपादन करणे,जागा ताब्यात घेणे ,नुकसान भरपाई देणे या सदरी करण्यांत आलेल्या तरतूदीमधून सदरची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सोलापूर शहरातील सर्व जलशुध्दीकरण केंद्रामध्ये व प्रमुख पाण्याच्या टाक्याच्या परिसरामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

...६

महिला व बालकल्याण विभागासाठी तरतुद करणेत आलेल्या रक्कमेचा विवरण खालील प्रमाणे असून त्याप्रमाणे रक्कम तरतुद करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

**महिला व बाल कल्याण विभाग**

| अ.क्र. | विवरण | र.रुपये लाखात |
|---|---|---|
| १. | महिला व मुली करीता विविध तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण | ५०.०० |
| २. | विडी कामगारांच्या मुलींना व गरजू महिलांकरिता व्यावसायिक प्रशिक्षण | १०.०० |
| ३. | वेश्या व्यवसायात गुंतलेल्या महिलांसाठी विविध प्रकारचे जिवन कौशल्य व व्यवसायिक प्रशिक्षण | ०३.०० |
| ४. | विद्यार्थीनी व महिलांसाठी विविध छंद वर्ग | १०.०० |
| ५. | बाल मेळावा | ०३.०० |
| ६. | महिला लोकप्रतिनिधीसाठी अभ्यासदौरा | ०८.०० |
| ७. | इयत्ता १० वी व १२ वी सी.ई.टी.मेरिट मधील मुलींचा गौरव | ०३.०० |
| ८. | महिला व मुलींसाठी विविध स्पर्धा, प्रोत्साहनपर उपक्रम तसेच प्रबोधनात्मक व्याख्यान | ०५.०० |
| ९. | महिला दिन सांस्कृतिक कार्यक्रम | ०५.०० |
| १०. | महिला व मुलींसाठी आरोग्य तपासणी (आरोग्य विभागाच्या विद्यमाने संपूर्ण तपासणी,औषधोपचार ) | ०८.०० |
| ११. | म.न.पा.दवाखान्यात गर्भवती महिलांसाठी पौष्टीक खाद्य,बाळंतपणातील आहार | ४.७० |
| १२. | ज्या महिलांनी विविध क्षेत्रात उत्कृष्ट काम केले अशा महिलांचा गौरव | ०२.०० |
| १३. | महिलांना कायदेविषयक सल्ला देण्यासाठी योजना राबविणे | ०१.५० |
| १४. | महिला व बाल कल्याण साठी वाचनालय चालविणे (पुस्तके,फर्निचर,मानधन ) | ०३.५० |
| १५. | गर्दीच्या ठिकाणी पिण्याची पाण्याची व्यवस्था / महिलांसाठी प्रसाधनगृह बांधणे | ५०.०० |
| १६. | वृध्दांना काठी,चष्मा वाटप,नेत्र तपासणी | ०८.०० |
| १७. | इयत्ता १ ली ते १० वी च्या मुलींसाठी मोफत बस सेवा योजना | २००.०० |
| १८. | सावित्रीबाई फुले,/अहिल्याबाई होळकर/,राजमाता जिजाऊ /मातोश्री रमाबाई आंबेडकर,/इंदिरा गांधी पुण्यतिथी/जयंती निमित्त विविध कार्यक्रम व उपक्रम | ०४.०० |
| १९. | महानगरपालिका क्षेत्रातील बालवाडीकरीता आवश्यक शैक्षणिक साहित्य खरेदी करणे (खेळणी व लोखंडी कपाट/पंखे इ.) | ०५.०० |
| २०. | जननी शिशु सुरक्षा योजना | १५.०० |
| २१. | महिला बचतगट क्षमता बांधणी उद्योजकता प्रशिक्षण | ०५.०० |
| २२. | महिला बचत गट उत्पादन वस्तू (साहित्य विक्री व प्रदर्शन ) | ०५.०० |
| २३. | एक किंवा दोन मुली असल्यास सुकन्या योजनेअंतर्गत र.रु. ५०००/- ठेव योजना | २०.०० |
| २४. | घरी व शाळेत मुलांना होणा-या क्रुर शिक्षा - प्रतिबंध जाणीव जागृती विविध उपक्रम | ०५.०० |
| २५. | शिवण प्रशिक्षण झालेल्या आर्थिक दुर्बल घटकातील महिलांना शिवणयंत्र वाटप | २३.०० |
| २६. | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील इयत्ता ५ वी ते १२ वी मध्ये शिकणा-या मुलींना सायकल वाटप | ०५.०० |
| २७. | पाळणा घर चालविण्या-या अशासकीय संस्थांना अर्थसहाय्य पुरविणे | ०५.०० |
| २८. | मुलींच्या सार्वजनिक शाळेत विविध क्रिडा सुविधा निर्माण करणे | ०५.०० |
| | **एकूण** | **४७१.७०** |

| अ.क्र. | विवरण | र.रुपये लाखात |
|---|---|---|
| | **महिला व बाल कल्याण विभाग संकीर्ण** | |
| १. | मुद्रण (प्रेस्टीसाईन बोर्ड,फॉर्मस इत्यादी ) | ०१.०० |
| २. | वृत्तपत्र खरेदी (समितीसाठी ) | ००.१५ |
| ३. | पोस्टेज खर्च | ००.१० |
| ४. | धुलाई ( पडदे इत्यादी ) | ००.०५ |
| ५. | दोन वाहनासाठी विमा हप्ता | ००.५० |
| ६. | संगणक प्रिंटर कॉपियर (स्टेशनरी ) | ०१.०० |
| ७. | इंधन तेले , दुरुस्ती ( दोन वाहनांसाठी ) | १०.०० |
| ८. | वाहन स्वच्छता,सुटेभाग रबरी धावा इत्यादी | ०२.०० |
| ९. | संकीर्ण साहित्य,फर्निचर स्टेशनरी, | ०२.०० |
| १०. | म.बा.क.कर्मचारी (संगणक ऑपरेटर-१ समूह संघटक-३ यांचे मानधन करिता) | १०.०० |
| ११. | ऐच्छिक खर्च (मा.सभापती यांना खर्चाचे अधिकारी राहतील) | ०१.५० |
| | **एकूण** | २८.३० |

**सारांश तक्ता**

| अ.क्र. | तपशिल | र.रुपये लाखात |
|---|---|---|
| १. | योजना/ उपक्रमाचा खर्च | ४७१.७० |
| २. | संकीर्ण - (म.बा.क. समिती कार्यालय) | २८.३० |
| | **एकूण** | ५००.०० |

तसेच भांडवली कामाच्या खर्चाच्या तक्त्यामधील शहर व हद्दवाढ भागातील विविध विकास कामे करणे याबाबतची यादी सोबत जोडली असून, त्यास मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

## सूचना व शिफारशी

१) शहरातील अनधिकृत बांधकामे शोधून त्यांचेकडून नियमानुसार दंड व बांधकाम शुल्क घेऊन जो भाग अनुज्ञेय असेल त्या भागात परवानगी देण्यांत यावी.

२) अनधिकृत बांधकामे करणा-यांवर कडक कारवाई करण्यांत यावी. त्यांचेकडून विकास शुल्काची रक्कम वसूल करुन घेण्यांत यावी.

३) कर आकारणी खात्याकडून गेल्या २० वर्षात रिव्हिजन झालेले नाही मिळकतींचा शोध झाल्याबरोबर मिळालेल्या माहितीप्रमाणे रिव्हिजन त्वरित पुर्ण करण्यांत यावे.

४) मिळकत करांची सहा सहा महिन्याची नोटीस काढण्यांत यावी. पाण्याची बिले वेगळी देण्यांत यावीत. त्यामुळे करदात्यांना कर भरणेस सोईस्कर होईल.

५) शहरातील पाणी पुरवठयाबाबत शहराचे दोन भाग करुन एक दिवसाआड पाणी पुरवठा करण्यासंदर्भात योग्य ते नियोजन करण्यांत यावे.

६) पाण्याच्या टाक्या, वितरण नलिका, पंप या साठी जे-जे कामे करणे आवश्यक आहे ती युध्दपातळीवर पुर्ण करण्यांत यावीत.

७) सार्व.आ.अभियंता विभागाकडे वॉटर ऑडीट व एनर्जी ऑडीट करण्यांत यावे.

८) एनटीपीसीच्या पाईपलाईनद्वारे पाणी द्यायचे असल्यास सांड पाण्यावर प्रक्रिया करुन ८० एमएलडी पाणी देण्याबाबत टर्सरी प्रकल्प त्वरित उभा करण्यासंदर्भात कार्यवाही ठेवावी.

९) अनधिकृत नळ शोध मोहिम गंभीरपणे हाती घेऊन अनधिकृत पाणी घेणा-यांवर कडक कारवाई करण्यांत यावी.

१०) हद्दवाढीमध्ये नव्याने झालेल्या प्रॉपर्टीचा शोध घेऊन त्यांचेवर आकारणी करण्यांत यावी.यामध्ये मोठया प्रमाणात वसूल गोळा होणार असून,विनाविलंब व बिनचुक कार्यवाही करणेत यावी.

११) युजर चार्जेस ज्या भागातून वसूल करण्यांत येतो,त्याच भागामध्ये तो पैसा ड्रेनेज लाईनचे कामाकरीता खर्च करण्यांत यावा.

१२) नळ कनेक्शन दिल्यानंतर कर आकारणी खात्याकडून सत्वर त्या संबंधीची कार्यवाही करुन नळाची आकारणी करण्यात यावी.

१३) एलबीटी मधील ज्या ११०० व्यापा-यांची वसुली व्हायची आहे त्यांचेकडून कायदेशीर बाबींचा अवलंब करुन वसुली करण्यांत यावी.

१४) एल.बी.टी.अंतर्गत व्यापा-यांच्या नोंदी नसतील तर त्यांच्या नोंदी करुन घेऊन त्यांचेकडून वसूली करण्यांत यावी.

१५) महानगरपालिकेत बसविलेल्या सीसीटीव्हीचा वापर कर्मचा-यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी करावा जेणेकरुन ते कर्मचारी आपल्या कार्यालयात बसून वेळेत कामाचा निपटारा करतील.

१६) महानगरपालिकेचे सर्वच विभागातील कर्मचा-यांचे दर तीन वर्षाला बदल्या करण्यात याव्यात.म्हणजे कामामध्ये गती येऊन कामे वेळेवर पूर्ण होतील.

...२

१७) आरोग्य खात्याकडील प्रसुतिगृहे व दवाखाने यांचेसाठी असलेल्या तरतूदींचा विनियोग तातडीने करुन गोरगरीबांना चांगली आरोग्य सेवा पुरविण्यांत यावी.

१८) आरोग्य खात्याच्या दवाखान्यामध्ये असलेले डॉक्टर्स वेळेवर येत नसतील किंवा काम करत नसतील तर त्यांचे ऐवजी नवीन डॉक्टरांची वॉक-इन-इंटरव्यु घेऊन भरती करण्यांत यावी.

१९) शहरातील मिनी व मेजर गाळेधारकांची ट्रान्सफर फी कमी करुन ते गाळे हस्तांतर केल्यास महानगरपालिकेस मोठया प्रमाणात उत्पन्न मिळेल. तसेच ज्या मिनी व मेजर गाळयांची मुदत संपली आहे त्यांना पुढील १० वर्षासाठी मुदत वाढवून देण्यांत यावी. व त्यांचेकडून रिजनेबल डिपॉझिट घेऊन भाडेवाढ करण्यांत यावी. यामुळे महानगरपालिकेचे उत्पन्नात वाढ होईल.

२०) युसीडी,समाजकल्याण,अपंग व महिला व बाल कल्याण हे विभाग एकत्रित करुन स्वतंत्र खात्याची निर्मीती करावी व त्यासाठी एक विभाग प्रमुखाची नेमणूक करण्यांत यावी व या खात्यात एकत्रित केलेल्या खात्यातील स्टाफ त्यांना देण्यांत यावा.या खात्याचे नियंत्रण सहाय्यक आयुक्त दर्जाच्या अधिकारी यांचेकडे असावा.

२१) सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीने शहरातील नामवंत, प्रतिष्ठीत, उद्योजक व सामाजिक संस्था यांच्या माध्यमातून सोलापूर शहरात हरित क्रांती घडविण्याच्या दृष्टीने रोड डिव्हायडरमध्ये व रस्त्याच्या दुतर्फा बाजूने झाडे लावणे, प्लॅन्टेशन करणे आणि प्रमुख चौक सुशोभित करणे याकरिता प्रशासनांनी वेळोवेळी संबंधिताच्या बैठका घेवून त्यांना महत्व पटवून देऊन प्रोत्साहन देवून सदरची कामे त्यांच्याकडून करुन घेणेचा गांभीर्याने प्रयत्न करणेत यावा.

२२) सोलापूर शहर व हद्दवाढ भागातील खुल्या जागेचे संरक्षणाकरिता चेनलिंग फेन्सींग करणेत यावे.

२३) सोलापूर शहर व हद्दवाढीतील गरीब व गरजू रूग्णांकरिता मोफत रूग्णवाहिका व शववाहिका उपलब्ध करून देण्यात यावे.

२४) महानगरपालिकेकडे शैक्षणिक पात्रता धारण करणारे व ज्यांच्याकडे ज्या पदाची वेतनश्रेणी आहे,त्याच सेवकांना व अधिका-यांना त्या त्या पदावर नेमणूक करण्यांत यावे.

२५) प.पु.महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची १२५ वी जयंती संपूर्ण भारत वर्षात मोठया उत्साहाने साजरी केली जाणार आहे. त्याचे औचित्य साधून सोलापूर शहरामध्ये वंचित घटकातील मुलांना ज्ञानार्जन करण्यासाठी शहरात असलेल्या विविध बागांमध्ये ओपन स्टडी सेंटर सुरु करुन अनोखे अभिवादन करणे.

२६) काही वेळेस महानगरपालिकेत विकास कामाचे अनावश्यक असे एस्टीमेट केले जातात त्यामुळे त्या कामाची गरज आहे किंवा नाही याचा कुठलाही विचार केला जात नाही यासाठी विकास कामाचा प्रस्ताव आल्यापासून त्याची आवश्यकता आहे किंवा नाही हे तपासून त्या कामाचा मक्ता मंजूर होईपर्यंतच्या पूर्ण कामावर नियंत्रण करणारी **विकास काम व्यवरथापन समिती** स्थापन करणेत यावी  व त्यांच्याकडे उपरोक्त जबाबदारी सोपविण्यात यावी.

...३

२७) मनपाच्या खुल्या जागा / स्मशानभूमी व बागा या ठिकाणी मोबाईल टॉवर उभारण्यास परवानगी देऊन त्यांच्याकडून भाडे आणि कर वसुल करण्यात यावे, जेणेकरुन मनपाच्या उत्पन्नात भर पडेल.

२८) बांधकाम परवाना विभागाकडून बांधकाम परवाना दिला जात असताना त्या परवान्यामध्ये त्या इमारतीवर सोलर पॅनल सिस्टीमची व्यवस्था करुन घेण्याची अट सक्तीची करावी जेणेकरुन, मा.पंतप्रधानांच्या वीज बचतीच्या राष्ट्रीय आवाहानाला मदत होईल.

२९) सध्या महाराष्ट्रात दुष्काळ पडलेला असून येत्या एप्रिल, मे आणि जून या काळात मनपाला सध्याच्या स्त्रोतामधून नागरीकांसाठी पाणी पुरवठा करणे अतिशय अवघड होणार आहे. त्यामुळे प्रशासनाने शहरातील भरपूर पाणी असलेले बोअर, विहिरी, ते सार्वजनिक असो अथवा खाजगी असो याचे तीन महिन्यासाठी अधिग्रहण करुन शहरातील नागरीकांना पाण्याची टंचाई भासु देऊ नये. यासाठी ही प्रक्रिया युध्दपातळीवर १ एप्रिल २०१६ पासूनच राबविण्यास सुरुवात करावी.

३०) मनपा इमारतीच्या (इंद्रभवन परिसर) छतावर उपलब्ध असलेल्या मोकळ्या जागेवर सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करुन मनपाचा वीजेचा खर्च वाचविण्याचा प्रयत्न करावा आणि राष्ट्रीय वीजबचत धोरणामध्ये सहयोग द्यावा.

३१) समाचार चौक सुशोभिकरण करणे.

३२) भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे विज्ञान विषयक दृष्टीकोन विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी व त्यांची स्मृति जतन करण्यासाठी मनपा शाळेतील विद्यार्थ्यांकरीता फिरते विज्ञान प्रयोग शाळा निर्माण करणे.

३३) सोलापूर शहरामध्ये जे लखपती थकबाकीदार आहेत त्यांची नांवे दरमहा प्रसिध्द करणे आणि त्या त्या महिन्यामध्ये त्यांच्यावर कारवाई करुन त्याचा अहवाल मा.स्थायी समितीकडे पाठविणे.

३४) आगामी काळात मनपाला स्वत:चे महसुली उत्पन्न वाढविणे अत्यंत गरजेचे असल्याने मनपा प्रशासनाने याबाबत गांभीर्यपूर्वक विचार करणे आवश्यक आहे. तसेच मा.स्थायी समितीस प्रत्येक आठवड्याला वसुलीच्या माहितीचा अहवाल सादर करावा आणि प्रत्येक महिन्यात मा.स्थायी समितीने महसुल विभागाच्या अधिका-याबरोबर स्वतंत्र बैठक घेऊन उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करावे.

३५) मनपाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास अत्यंत ढिसाळपणा दिसून येतो. सध्याची व्यवस्था ही अतिशय ढिसाळ आहे या व्यवस्थेमध्ये सिक्युरिटी गार्डला कार्यालयीन शिपायाचा दर्जा प्राप्त झालेला आहे असे दिसून येते. मनपाचे पाणी पुरवठा सारखे अत्यंत संवेदनशील विभाग असून यासाठी स्वतंत्र सुरक्षा विभागाची स्थापना करुन त्यावर सुरक्षा अधिका-याची नेमणूक करावी तसेच ही संपूर्ण यंत्रणा सदर अधिका-याच्या अधिपत्त्याखाली कामकाज करेल अशी व्यवस्था व्हावी.

३६) वीज बीलावर मनपाचा प्रचंड प्रमाणावर खर्च होत आहे त्यामुळे बरीच मोठी रक्कम या सदरी खर्ची पडते. सध्या एल.ई.डी. चे नवीन तंत्रज्ञान विकसीत झालेले आहे त्याचा वापर केल्यास वीज बिलावर मोठया प्रमाणात बचत होईल यासाठी संपूर्ण शहरातील पथदिवे एल.ई.डी. चे बसविण्यात यावे ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर वीज बचत होईल व तसेच मनपाचा आर्थिक फायदाही होईल.

३७) सोलापूर महानगरपालिकेचे महसूली उत्पन्न वाढविण्याचेदृष्टीने हद्दवाढीतील काही आरक्षित जागा किंवा रहिवास जागासाठी अनेक प्लॉट व लेआऊट किंवा एकरी जागा असून त्यावर अद्याप कराची आकारणी करण्यात आलेल्या नाहीत. परंतु जे मिळकतदार स्वत:हून मिळकतीच्या नोंदीसाठी येतात त्यांच्याच जागेवर कराची आकारणी करुन असेसमेंटला नोंद घेण्यात येत असते. परंतु जे नोंदीसाठी येत नाहीत त्या जागांचा सर्व्हे करुन त्या जागेवर आकारणीची कार्यवाही सत्वर करण्यात यावी. या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाकडील उपनिबंधक कार्यालयाकडे जागेचे खरेदी विक्री नोंद असलेल्या ठिकाणी जाऊन संबंधित जागेचे सातबारा उतारा घेऊन मूळ मालकास नोंटीस बजावल्यास त्यांना सदरजागा कोणाला विकली आहे त्याबाबत प्रतिज्ञापत्र घेऊन संबंधित जमिनधारकाला आकारणी संदर्भात नोटीस काढावी जेणेकरुन मनपा तिजोरीत महसूल जमा होईल.

३८) सोलापूर शहर व हद्दवाढ भागात अशा अनेक मिळकती व खुली जागा आहेत की ते जागा प्लॉट नोटरी करुन अनेकांना विकलेली आहेत. प्रत्यक्षात नोटरीमुळे अनेकजण मालकी हक्क सांगतात. त्या प्लॉट अथवा जागेपोटी कोणाचे नांव लावून कराची आकारणी करावी याबाबत प्रशासकीय स्तरावर धोरण अवलंबून कार्यवाही ठेवावी. जेणेकरुन आपणास महसूल गोळा करताना त्रासदायक ठरु नये.

३९) जी.आय.एस. प्रणाली युध्दपातळीवर राबवून त्या निकषाप्रमाणे कार्यवाही त्वरीत ठेवण्यात यावी. या प्रक्रियेस प्रशासकीय गती वाढविण्याची आवश्यकता आहे.

४०) तसेच सध्या मिळकतकराच्या बिलामध्ये ज्या मिळकतदारांनी वेळेवर बिले भरली जात नाहीत त्यांना मागील थकबाकीमुळे २ टक्के शास्ती म्हणून दंडाची आकारणी करीत असल्याचे दिसून येत आहे. वास्तविक वारंट फी व नोटीस फी आकारणी होत असताना अशा प्रकारे शास्तीची रक्कम लावणे ही बाब अत्यंत जाचक असून तो आजला रद्द करण्यात यावा. आजला सन २०१४-१५ सालाची बिले वाटप करण्यात आलेली असून, त्यामधून ही रक्कम शास्तीपोटी वसूल करण्यात आलेली आहे ती पुढील बिलामध्ये वळते करुन वजावट करुन बिले देण्याची कार्यवाही ठेवावी.

४१) म.न.पा. कडून केलेजाणारे पाणी पुरवठयाचा एकत्रित क्षारप्रमाण (टीडीएस) रोजच्या रोज तपासून त्याबद्दलचा दैनंदिन अहवाल मा. आरोग्याधिकारी व मा. सार्वजनिक आरोग्य अभियंता यांनी एकत्र करुन प्रत्येक आठवडयाला मा. स्थायी समिती सभेत सादर करावा.

४२) मनपाकडून देण्यात येणा-या बांधकाम परवान्यास विनाकारण विलंब होत असल्याने बरेच लोक विना परवाना बांधकाम करताना दिसत आहेत त्यामुळे बांधकाम परवान्यासाठी प्रकरण झाल्यापासून विहित मुदतीमध्ये बांधकाम परवाना दिले अथवा नाकारलेबाबत कारणमिमांसासह संबंधीतांना वेळेत कळविण्याची कार्यवाही ठेवावी.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका